# MARATHI

## Paper II

# मराठी

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**सूचना** : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. परळ येथील शिलालेखाचा काळ कोणता ?

(A) शके 972

(B) शके 1109

(C) शके 1059

(D) शके 1030

2. "फुले दांडे आचंद्रार्क चालावेआ नाना भक्त मालीआं दत्त पैकाचा विवरू" ही ओळ कोणत्या शिलालेखातील आहे ?

(A) कनकेश्वर

(B) श्रवणबेळगोळ

(C) पळसदेव

(D) पंढरपूर

3. भाषाकुलाच्या विभागणीनुसार पुढीलपैकी कोणत्या भाषांचा गट एका भाषाकुलात येतो ?

(A) मराठी, कोकणी, गुजराती, पंजाबी

(B) गुजराती, तमिळ, मणिपुरी, भोजपुरी

(C) तमिळ, कन्नड, मराठी, मल्याळम्

(D) मराठी, कोकणी, गुजराती, कन्नड

4. 'वैखरी' या ग्रंथाचा लेखक कोण ?

(A) ना. गो. कालेलकर

(B) मिलिंद मालशे

(C) स. गं. मालशे

(D) अशोक केळकर

5. पुढीलपैकी दन्तमूलीय कंपित स्वन कोणता ?

(A) य

(B) र

(C) ल

(D) व

6. कोणत्याही भाषेला स्वत:ची अशी व्याकरणिक व्यवस्था असतेच, कारण :

(A) त्याशिवाय ती लेखनासाठी वापरता येणार नाही.

(B) त्याशिवाय तिला प्रतिष्ठा मिळणार नाही.

(C) त्यावाचून आशयाची देवाणघेवाण अशक्य आहे.

(D) सुसंस्कृतपणासाठी नियमांची चौकट आवश्यकच असते.

7. भाषिक रचना म्हणजे काय ?

(A) अर्थदृष्ट्या विघटनक्षम भाषिक रूपे

(B) सलग ध्वनिमालिका

(C) सार्थ ध्वनिसमूह

(D) ध्वनिदृष्ट्या विघटनक्षम भाषिक रूपे

8. 'अडकित्ता' हा शब्द कोणत्या द्रविडी भाषेतून आला ?

(A) तमिळ

(B) कन्नड

(C) तेलुगु

(D) तुळू

9. 'डावा-उजवा', 'मागे-पुढे' ही उदाहरणे विरोधाचा कोणता प्रकार दर्शवतात ?

(A) बहुविध

(B) ध्रुवात्मक

(C) द्विपर्यायी

(D) व्यत्यासात्मक

10. पुढीलपैकी कोणती उदाहरणे अभ्यस्त शब्दांची आहेत ?

(A) कापडचोपड, हळूहळू

(B) राजपुत्र, पंचानन

(C) मुलगा, नवीन

(D) घराला, बागेत

11. 'अहिराणी' ही भाषा कोणत्या प्रदेशात बोलली जाते ?

(A) कोकण

(B) नागपूर

(C) खानदेश

(D) मराठवाडा

12. 'वंशवृक्ष' या कन्नडमधून मराठीत आलेल्या कादंबरीचे मूळ लेखक कोण ?

(A) एस्. एल्. भैरप्पा

(B) गिरीश कर्नाड

(C) चंद्रशेखर कंबार

(D) शिवराम कारंत

13. 'एका कोळियाने' हे कोणत्या कादंबरीचे भाषांतर आहे ?

(A) फॉर हूम द बेल टोल्स

(B) द ओल्ड मॅन अँड द सी

(C) युलिसिस

(D) द कॅचर इन द राय

14. महानुभाव तत्त्वज्ञानाचा प्रमाणग्रंथ कोणता ?

(A) सूत्रपाठ

(B) स्मृतिस्थळ

(C) दृष्टांतपाठ

(D) हेतुस्थळ

15. 'तीर्थी धोंडा-पाणी, देव रोकडा सज्जनी ।' हा अभंग कोणी लिहिला ?

(A) रामदास

(B) तुकाराम

(C) एकनाथ

(D) चोखामेळा

16. ग्रंथ व ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | 'सीतास्वयंवर' | (5) | श्रीधर |
| (2) | 'रुक्मिणीहरण' | (6) | बीडकर विठ्ठल |
| (3) | 'रुक्मिणीस्वयंवर' | (7) | रघुनाथ पंडित |
| (4) | 'श्रीरामविजय' | (8) | सामराज |
| | | (9) | नागेश |

(A) 1—6, 2—7, 3—8, 4—5

(B) 1—9, 2—8, 3—7, 4—6

(C) 1—6, 2—8, 3—9, 4—5

(D) 1—6, 2—8, 3—9, 4—7

17. पुढीलपैकी कोण समकालीन नव्हते ?

(A) रामदास – तुकाराम

(B) ज्ञानेश्वर – नामदेव

(C) गोरा कुंभार – चोखामेळा

(D) जनाबाई – एकनाथ

18. 'सभासदाची बखर' ही शिवचरित्र वर्णन करणारी बखर आहे आणि ती ऐतिहासिकदृष्ट्या सर्वात विश्वसनीय मानली जाते.

(A) संपूर्ण विधान चूक आहे.

(B) संपूर्ण विधान बरोबर आहे.

(C) पूर्वार्ध बरोबर असून उत्तरार्ध चूक आहे.

(D) पूर्वार्ध चूक असून उत्तरार्ध बरोबर आहे.

19. 'राजा शिवाजी' हे महाकाव्य कोणाचे ?

(A) कालिदास

(B) बाबासाहेब पुरंदरे

(C) म. मो. कुंटे

(D) कवी यशवंत

20. मुक्ता साळवे यांचा 'महार-मांगांच्या दु:खाविषयी निबंध' कोठे प्रकाशित झाला ?

(A) ज्ञानप्रकाश

(B) विविधज्ञानविस्तार

(C) ज्ञानचंद्रिका

(D) ज्ञानोदय

21. कादंबरी आणि कादंबरीकार यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) 'काळोखाचे अंग' | (5) ए. वि. जोशी |
| (2) 'साहेब' | (6) अनिल दामले |
| (3) 'कळ' | (7) श्याम मनोहर |
| (4) 'गौतमची गोष्ट' | (8) उद्धव शेळके |
| | (9) रा. रं. बोराडे |

(A) 1—5, 2—8, 3—7, 4—6

(B) 1—9, 2—5, 3—8, 4—6

(C) 1—8, 2—5, 3—6, 4—9

(D) 1—7, 2—8, 3—6, 4—5

22. 'विश्रब्ध शारदा' हा ग्रंथ कोणी सिद्ध केला ?

(A) श्री. म. माटे

(B) ह. वि. मोटे

(C) वि. द. घाटे

(D) म. श्री. दीक्षित

23. 'निळासावळा', 'काजळमाया', 'रमलखुणा' हे कथासंग्रह कोणाचे ?

(A) सदानंद रेगे

(B) चिं. त्र्यं. खानोलकर

(C) कमल देसाई

(D) जी. ए. कुलकर्णी

24. भीमराव गस्ती यांचे स्वकथनपर लेखन कोणते ?

(A) 'वस्ती'

(B) 'फांजर'

(C) 'बेरड'

(D) 'ढोर'

25. व्यंकटेश माडगूळकर यांची वन्य प्राणीजीवनावरील कादंबरी कोणती ?

(A) 'करुणाष्टक'

(B) 'सत्तांतर'

(C) 'कोवळे दिवस'

(D) 'वावटळ'

26. कवी व त्यांची टोपणनावे यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) निशिगंध | (5) मा. के. काटदरे |
| (2) माधवानुज | (6) रा. ग. गडकरी |
| (3) गोविंदाग्रज | (7) रा. श्री. जोग |
| (4) माधव जूलियन | (8) मा. त्र्यं. पटवर्धन |
| | (9) वा. रा. कांत |

(A) 1—5, 2—7, 3—6, 4—8

(B) 1—9, 2—7, 3—6, 4—8

(C) 1—7, 2—5, 3—6, 4—8

(D) 1—7, 2—9, 3—6, 4—5

27. 'बॅरिस्टर' हे नाटक कोणत्या कादंबरीवर आधारित आहे ?

(A) 'बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर'

(B) 'हद्दपार'

(C) 'सरहद्द'

(D) 'अंधाराच्या पारंब्या'

28. 'झाडे झाली निळी निळी करांगुळी गोवर्धन' ही ओळ कोणाची ?

(A) कुसुमाग्रज

(B) अनिल

(C) वा. रा. कांत

(D) बा. भ. बोरकर

29. तंजावर येथील सुप्रसिद्ध ग्रंथसंग्रहालय कोणते ?

(A) मराठी ग्रंथसंग्रहालय

(B) सरस्वती महाल

(C) समर्थ वाग्देवता मंदिर

(D) करवीर वाचन मंदिर

30. 'शोध बाळगोपाळांचा' हा चरित्रग्रंथ कोणी लिहिला ?

(A) य. दि. फडके

(B) धनंजय कीर

(C) वीणा गवाणकर

(D) गोविंद तळवलकर

31. "पंचधारा" कोणत्या संस्थेचे मुखपत्र आहे ?

(A) कर्नाटक मराठी साहित्य परिषद

(B) विदर्भ साहित्य संघ

(C) मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश

(D) गोमंतक मराठी साहित्य अकादमी

32. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा' अशी प्रतिभेची व्याख्या कोणी केली ?

(A) भट्टतौत

(B) अभिनवगुप्त

(C) भट्टनायक

(D) राजशेखर

33. रसाच्या संदर्भात अनुकरणाची कल्पना कोणी मांडली ?

(A) श्रीशंकुक

(B) कुंतक

(C) दण्डी

(D) भट्टलोल्लट

34. कारयित्री प्रतिभा आणि भावयित्री प्रतिभा हा भेद कोणी केला ?

(A) जगन्नाथ पंडित

(B) अभिनवगुप्त

(C) मम्मट

(D) राजशेखर

35. 'औचित्यविचार चर्चा' हा ग्रंथ कोणी लिहिला?

(A) माहिमभट्ट

(B) क्षेमेंद्र

(C) भट्टलोल्लट

(D) रुद्रट

36. रीतिसिद्धांताचा प्रवर्तक कोण ?

(A) भामह

(B) क्षेमेंद्र

(C) वामन

(D) कुंतक

37. शोकांतिकेच्या परिणामाच्या संदर्भात ॲरिस्टॉटलने कोणती कल्पना मांडली ?

(A) प्रेरणासंतुलन

(B) भावनासंक्रमण

(C) इच्छापूर्ती

(D) कॅथार्सिस

38. 'अविश्वासाचे स्वेच्छानिलंबन' ही कल्पना कोणी मांडली ?

(A) एस्. टी. कोलरिज

(B) वर्डस्वर्थ

(C) मॅथ्यू अर्नोल्ड

(D) टी. एस्. इलियट

39. रसाचा अनुभव खऱ्या अर्थाने कोण घेऊ शकतो ?

(A) कवी आणि वाचक

(B) कोणीही वाचक

(C) केवळ सहृदय

(D) केवळ कवी

40. नाटकाच्या संदर्भात तीन प्रकारच्या एकात्मतेची कल्पना कोणी मांडली ?

(A) प्लेटो

(B) होरेस

(C) ॲरिस्टॉटल

(D) कांट

41. जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| (1) सचेतन तोल | (5) प्रभाकर पाध्ये |
| (2) भावनानिष्ठ समतानता | (6) माधव आचवल |
| (3) मानुषता | (7) बा. सी. मर्ढेकर |
| (4) बद्ध प्रतिभा व मुक्त प्रतिभा | (8) रा. श्री. जोग |
| | (9) शरच्चंद्र मुक्तिबोध |

(A) 1—8, 2—7, 3—5, 4—6

(B) 1—6, 2—7, 3—9, 4—5

(C) 1—5, 2—7, 3—9, 4—8

(D) 1—7, 2—6, 3—8, 4—5

42. 'पाया आणि इमारत' हे कोणत्या वादातील केंद्रवर्ती सूत्र आहे ?

(A) अस्तित्ववाद

(B) वास्तववाद

(C) समाजवाद

(D) मार्क्सवाद

43. कांटच्या कलाविषयक सिद्धांताचे विवेचन मराठीत कोणी केले ?

(A) रा. भा. पाटणकर

(B) प्रभाकर पाध्ये

(C) मे. पुं. रेगे

(D) गंगाधर पाटील

44. प्रत्यभिज्ञेची उपपत्ती कोणी मांडली ?

(A) वा. ल. कुलकर्णी

(B) द. भि. कुलकर्णी

(C) कृ. पां. कुलकर्णी

(D) व. दि. कुलकर्णी

45. टॉलस्टॉयच्या 'व्हॉट इज आर्ट' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर कोणी केले ?

(A) काका कालेलकर

(B) साने गुरुजी

(C) वा. म. जोशी

(D) वि. स. खांडेकर

46. वृत्तलेखनाची भाषा कशी असावी ?

(A) आलंकारिक

(B) चटपटीत

(C) व्यक्तिनिष्ठ

(D) वस्तुनिष्ठ

47. सर्वनामांचा जेव्हा विशेषणाप्रमाणे उपयोग होतो तेव्हा त्यास काय म्हणतात ?

(A) सार्वनामिक विशेषण

(B) संख्याविशेषण

(C) समूहवाचक विशेषण

(D) अधिविशेषण

48. 'त्याने हे काम केले' – या वाक्यातील प्रयोग कोणता ?

(A) कर्तरी

(B) भावे

(C) संकीर्ण

(D) प्रधानकर्तृक कर्मणी

49. विभक्तिप्रत्ययक्षम शब्दाच्या रूपास काय म्हणतात ?

(A) विकरण

(B) संयुक्तरूप

(C) सामान्यरूप

(D) कृदन्त

50. पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमांनुसार आहे ?

(A) कोट्यधीश

(B) कोट्याधीश

(C) कोट्यधिश

(D) कोट्यधीष

## ROUGH WORK

## ROUGH WORK